॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com


**※ सुविचार ※**
संयम नावाच्या कटू वृक्षाचे फळे नेहमी गोड असतात.

■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३४२ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

# डिजिटल पद्धतीने होणार जणगणना

## दोन टप्प्यांत प्रक्रिया पूर्ण । १ मेपासून घरगणना, नागरिकांसाठी स्वयंगणनेची सुविधा उपलब्ध

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
भारतातील जनगणना ही जगातील सर्वात मोठ्या सांख्यिकीय उपक्रमांपैकी एक मानली जाते. १८७२ पासून सुरू झालेली ही परंपरा २०११ पर्यंत अखंडपणे पार पडली असून कोविड-१९ मुळे पुढे ढकलण्यात आलेली जनगणना-२०२७ आता नव्या डिजिटल स्वरूपात राबविण्यात येत आहे. २०२७ ची ही जनगणना १८७२ नंतरच्या मालिकेतील १६ वी व स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

जनगणना-२०२७ ही दोन टप्प्यांत पूर्ण केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात घरांची यादी व घरगणना करण्यात येणार असून हा टप्पा १ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. यामध्ये १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत स्वयंगणना सुविधा उपलब्ध राहणार आहे, तर १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान प्रगणकांकडून प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षण केले जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्या गणना २०२७ मध्ये पार पडणार आहे.

जिल्ह्यात जनगणना – २०२७ साठी मोठ्या प्रमाणावर यंत्रणा कार्यरत करण्यात आली असून एकूण ३० चार्ज अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. याशिवाय सुमारे ६,८६९ प्रगणक व १,१४५ पर्यवेक्षक अशा एकूण ८,०१४ कर्मचाऱ्यांची, तसेच याव्यतिरिक्त १० टक्के अतिरिक्त मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्वांना दि. २३ एप्रिल ते ८ मे २०२६ या कालावधीत प्रशिक्षण दिले जात आहे.



या जनगणनेचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच डिजिटल माध्यमातून माहिती संकलन करण्यात येणार आहे. नागरिकांना स्वयंगणना करण्यासाठी https://se.census.gov.in या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून ती १ मे ते १५ मे या कालावधीत खुली राहणार आहे. या पोर्टलवर इंग्रजी, हिंदीसह इतर १४ भाषांमध्ये माहिती भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.

क्षेत्रीय स्तरावर घरगणना करताना प्रगणकांकडून नागरिकांना सुमारे ३३ प्रकारचे प्रश्न विचारले जाणार असून त्यामध्ये घरांची संख्या, घरांचा प्रकार, कुटुंबाची माहिती तसेच सामाजिक व आर्थिक बाबींचा समावेश असेल.

जनगणना-२०२७ ही राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून अचूक व विश्वासार्ह माहिती देणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. डिजिटल माध्यमाचा अधिकाधिक वापर करून स्वयंगणना प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहनही प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची प्रशिक्षण सत्रास भेट

■ जनगणना – २०२७ च्या निमित्ताने प्रत्येक तालुकास्तरावर प्रगणकांसाठी प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. प्रगणकांना तज्ज्ञांमार्फत प्रशिक्षण देण्यात येत असून या प्रशिक्षणास जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया हे स्वतः भेट देऊन प्रशिक्षणाची माहिती घेत आहेत. जनगणना ही देशाच्या नियोजन प्रक्रियेसाठी अत्यंत महत्त्वाची व मूलभूत माहिती देणारी प्रक्रिया असल्याने प्रत्येक प्रगणकाने स्वतःवर सोपवलेली जबाबदारी अत्यंत अचूकपणे व प्रामाणिकपणे पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या आहेत.

## SPOT NEWS

### राज्यातील कृषी केंद्रांचा आजपासून बेमुदत संप

● **मुंबई** – गेल्या चार-पाच वर्षापासून कृषी विभागाकडे प्रलंबित असलेल्या विविध मागण्यांची अंमलबजावणी होत नसल्याच्या निषेधार्थ राज्यातील कृषी केंद्रधारकांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. 'महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टिसाइड्स सीड्स डीलर्स असोसिएशन'ने (माफदा) सोमवारपासून राज्यातील सर्व विक्री केंद्रे बेमुदत बंद ठेवण्याचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे दिला आहे. गुणवत्ता तपासणीसाठी घेतलेल्या सॅम्पलची रक्कम रोखीने अदा करावी; तसेच नवीन बियाणे व कीटकनाशके कायदा २०२५ मधील जाचक अटी शिथिल कराव्यात, याकडेही शासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. मागण्या मान्य होईपर्यंत राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील विक्री केंद्रे बंद राहतील, असा पवित्रा 'माफदा'चे अध्यक्ष विनोद तराळ-पाटील व सरचिटणीस विपीन कासलीवाल यांनी घेतला आहे.

### वाढत्या उष्णतेमुळे शिक्षकांना मे महिण्यात कामे देवू नका

● **अहिल्यानगर** – राज्यात सध्या प्रचंड उष्णतेची लाट उसळली असून उष्माघातामुळे नागरिकांच्या, विशेषतः शिक्षकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. काही ठिकाणी शिक्षकांचे बळी गेल्याच्या घटनाही समोर येत आहेत, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. अशा परिस्थितीत मे महिन्यात शिक्षकांकडून विविध कामे करून घेण्याच्या धोरणाचा पुनर्विचार करा, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण ठुबे यांनी प्रशासनाकडे केली आहे. मे महिन्यात तापमान उच्चांक गाठत असताना शिक्षकांना शाळाबाह्य कामांसाठी, सर्वेक्षणासाठी, प्रशिक्षणासाठी किंवा इतर शासकीय उपक्रमांसाठी बाहेर पडावे लागते. उष्माघात, निर्जलीकरण, थकवा यांसारख्या समस्या वाढत असून त्याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे, अशी मागणी ठुबे यांच्यासह भास्कर नरसाळे, मधुकर मैड, अमोल साळवे, मंडळाचे जिल्हाध्यक्ष सुरेश निवडुंगे, कार्यालयीन चिटणीस गणेश वाघ, रघुनाथ झावरे आदींनी प्रशासनाकडे केली आहे.


## चौथी, सातवीच्या एक लाख २४ हजार विद्यार्थ्यांनी दिली शिष्यवृत्ती परीक्षा

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यावतीने प्राथमिक शिक्षण विभागातर्फे प्राथमिक (चौथी) व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती (सातवी) परीक्षा रविवारी जिल्ह्यात सुरळीत पार पडली. चौथीसाठी ३४४ परीक्षा केंद्रे होती. तेथे ८ हजार २४ शाळांतील ९८ हजार ३७८ विद्यार्थी होते. सातवीच्या वर्गासाठी जिल्ह्यात १९७ केंद्रांवर १ हजार ४९५ शाळांतील २४ हजार ८८४ विद्यार्थ्यांची नोंद होती. एकूण परीक्षार्थींपैकी ९७ टक्के विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी नियोजन केले होते. जिल्हा परिषदेच्या सर्व अधिकाऱ्यांनी परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या. तहसीलदार, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुखांनीही परीक्षा केंद्रांना भेटी देऊन पाहणी केली. पहिल्या पेपरला हजर असणाऱ्या काही विद्यार्थ्यांनी दुसऱ्या पेपरला दांडी मारल्याचे दिसून आले. चौथीचे चौदा, तर आठवीचे तीन विद्यार्थी दुसऱ्या पेपरला गैरहजर होते.




# संगमनेर तालुक्यात एकाच दिवशी रोखले दोन बालविवाह



● **संगमनेर । वीरभूमी –**
संगमनेर तालुक्याच्या ग्रामीण भागातील दोन गावांमध्ये रविवारी होत असलेले बालविवाह प्रशासनाने सतर्कता दाखवत रोखले. संबंधित दोन्ही अल्पवयीन मुलींचे वय साधारण १७ वर्षे इतके आहे. त्यातील एकीचा विवाह २६, तर दुसरीचा विवाह २४ वर्षे इतके वय असलेल्या युवकाशी लावण्याची तयारी सुरू होती.

अहिल्यानगर जिल्ह्यात स्नेहालय संचलित उडान प्रकल्प आणि स्थानिक प्रशासन, पोलिस प्रशासनाच्या कारवाईतून दोन अल्पवयीन मुलींचे बालविवाह रोखण्यात यश आले, अशी माहिती स्नेहालय उडान प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापक प्रवीण कदम यांनी दिली.

२६ एप्रिल रोजी उडान प्रकल्पाच्या हेल्पलाइन क्र. १०९८ वर संगमनेर तालुक्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी बालविवाह होणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार कदम आणि सामाजिक कार्यकर्त्या सीमा कौर जुनी यांनी स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधत ग्रामसेवक व बालविवाह प्रतिबंधक अधिकारी तसेच पोलिस हेल्पलाइन ११२ वर माहिती दिली. पहिला विवाह दाढ खुर्द येथे आणि दुसरा संगमनेर खुर्द येथे होणार असल्याचे स्पष्ट झाले. माहिती मिळताच पोलिस यंत्रणा तातडीने घटनास्थळी पोहोचली.

सुरुवातीला संबंधित कुटुंबीयांनी हा केवळ साखरपुडा असल्याचे सांगून कारवाई टाळण्याचा प्रयत्न केला; मात्र उडान प्रकल्पाच्या टीमने योग्य कायदेशीर मार्गदर्शन केले. परिणामी, साखरपुडाही थांबविण्यात आला.

दुसऱ्या प्रकरणात ग्रामसेवक सुनील नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक ग्राम बाल संरक्षण समिती, तिचे अध्यक्ष व सदस्य यांच्या सहकार्याने आणि स्नेहालय उडान प्रकल्पाच्या समन्वयातून बालविवाह रोखण्यात यश आले. स्थानिक प्रशासन, पोलिस यंत्रणा आणि सामाजिक संस्थांचा समन्वय हा निर्णायक ठरला.

SPOT NEWS

## मुख्याध्यापक नामदेव पतंगे यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

**नेवासा । वीरभूमी –**
तालुक्यातील वडाळा मिशन येथील ओ.सी.पी.एम. स्कूलचे मुख्याध्यापक नामदेव राजाराम पतंगे यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. शिक्षण क्षेत्रात तब्बल ४० वर्षे दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांचा मानपत्र व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी मिशनचे सचिव डी. जी. भांबळ उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील व मराठी मिशनच्या अध्यक्षा विजयाताई जाधव उपस्थित होते. यावेळी ललित दादा मोटे पाटील (सरपंच, वडाळा बहिरोबा), दिलीपराव मोटे पाटील (चेअरमन, जाणता राजा पतसंस्था ), भाऊसाहेब मोटे (संचालक मुळा स सा कारखाना), गुलाब सय्यद (माजी शिक्षणाधिकारी), अभयकुमार वाव्हळ (गटशिक्षणाधिकारी), सुरेश ढवळे (विस्तार अधिकारी माध्यमिक जि.प.), प्रसाद शिंदे (स्वाभिमानी शिक्षक संघटना), विठ्ठल उरमुडे (अध्यक्ष, खाजगी प्राथमिक शाळा संघटना), भास्कर नरसाळे, सुनिल नरसाळे (केंद्रप्रमुख), ज्ञानेश चव्हाण (सचिव रे.शि.प्र. मंडळ), नितीन घाडगे (सहसचिव रे.शि.प्र. मंडळ), रंगनाथ बोबडे (मुख्या ध्यापक रे.शि. प्र.मं. प्राथ विद्यालय) आदी मान्यवर उपस्थित होते.

## पीपल्स हेल्पलाईनने लग्नात वाटले ‘शिवाजी कोण होता?’ पुस्तक

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या शीर्षकावरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी पुस्तकाच्या प्रकाशकांना अश्लील भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार घडल्याबद्दल पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा इतिहास जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने शहरातील एका विवाह सोहळ्यात उपस्थित वऱ्हाडी मंडळींना शिवाजी कोण होता? हे पुस्तक वाटप करण्यात आले. पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून ते आजच्या भारतासाठी जिवंत प्रेरणामिशन आहेत. आजच्या समाजात अजूनही जातव्यवस्था आणि स्त्रीदास्याचे अस्तित्व दिसून येते. मात्र, स्वराज्य स्थापनेच्या काळात शिवाजी महाराज आणि जिजाऊ यांनी अन्यायकारक परंपरांना फाटा देत समानता, स्वातंत्र्य आणि स्वाभिमानावर आधारित स्वराज्य उभारले.

## केशरबाई कापसे यांचे निधन

**कोपरगाव । वीरभूमी–**
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुका सचिव पत्रकार



विजय कापसे यांच्या आजी केशरबाई वामनराव कापसे यांचे वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने शुक्रवार दि २४ मार्च रोजी दुःखद निधन झाले. त्यांचा पश्चात मुलगा शिवाजी वामन कापसे, नारायण वामन कापसे, सुना सुशीला शिवाजी कापसे, हिराबाई नारायण कापसे, नातू विजय शिवाजी कापसे, गणेश शिवाजी कापसे, नाती पल्लवी समाधान शिंदे, मोनिका सुनील ठोंबरे, कोमल शुभम कदम, गायत्री नारायण कापसे, साक्षी नारायण कापसे, नात सून सोनाली विजय कापसे, पूनम गणेश कापसे, पणतू पवन विजय कापसे, आरव गणेश कापसे सानवी विजय कापसे आदी परिवार आहे.

# श्रीरामपुरात गोदा ते नर्मदा जलयात्रेचे भव्य स्वागत

### जलसंवर्धनाचा प्रभावी संदेश गाजला । स्वागत कमानी, फलक, फुलांची सजावट आणि घोषणांनी वातावरण भारावून गेले

**श्रीरामपूर । वीरभूमी –**
शहरात आज जलसंवर्धनाचा प्रभावी संदेश देणाऱ्या ‘गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी जलयात्रा २०२६’चे अत्यंत भव्य आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. संपूर्ण शहरात या यात्रेच्या स्वागतासाठी मोठी तयारी करण्यात आली होती. ठिकठिकाणी स्वागत कमानी, फलक, फुलांची सजावट आणि घोषणांनी वातावरण भारावून गेले होते. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या जलजागृती यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



जामखेड तालुक्यातील श्रीक्षेत्र चौंडी येथून प्रारंभ झालेली ही जलयात्रा राज्यभर प्रवास करत असून, जलसंवर्धनाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य करत आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त या विशेष यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ‘जन्मभूमी ते कर्मभूमी’ या संकल्पनेतून जलसंवर्धनाचा व्यापक संदेश देत ही यात्रा पुढे सरकत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि राज्याच्या जलसंपदा विभागाच्या माध्यमातून हा उपक्रम राबवला जात आहे. तसेच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि गिरीश महाजन यांच्या पुढाकारातून ही यात्रा चौंडी ते महेश्वर असा महत्त्वपूर्ण प्रवास करत आहे. या यात्रेमुळे पाणी वाचवा, पाणी साठवा आणि पाण्याचे योग्य व्यवस्थापन करा, असा संदेश समाजात प्रभावीपणे पोहोचत आहे.

श्रीरामपूरमध्ये आगमन होताच यात्रेचे हनुमान मंदिर परिसरात पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात, फुलांच्या वर्षावात आणि जलसंवर्धनाच्या घोषणांनी वातावरण दणाणून गेले. यावेळी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी उपस्थितांसह आरती करून यात्रेचे स्वागत केले. यानंतर यात्रेने शहरातील विविध धार्मिक व ऐतिहासिक स्थळांना भेट दिली. शिवसृष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक तसेच गुरुद्वार येथे दर्शन घेण्यात आले. प्रत्येक ठिकाणी यात्रेचा सन्मान करण्यात आला आणि जलसंवर्धनाचा संदेश देण्यात आला.

या स्वागत सोहळ्यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर तसेच भाजप नेते संजय फंड, गटनेत्या वैशाली चव्हाण, नगरसेवक श्रीनिवास बिहाणी, सिद्धार्थ फंड, दिपक चव्हाण, मा नगराध्यक्षा अनुराधा आदिक, संजय छल्लारे, बंडुकुमार शिंदे, भाजपचे उपजिल्हाध्यक्ष दिपक पटारे, भाजपा तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड, नगरसेवक श्रीनिवास बिहाणी, मा. नगराध्यक्ष संजय फंड, नाना शिंदे, पक्षप्रतोत वैशाली चव्हाण, नगरसेवक संजय गांगड, रवी पाटील, आशिष धनवटे, मनोज लबडे, तिलक डुंगरवाल, केतन खोरे, शरद नवले, डॉ. शंकर मुठे, भीमराज बागुल, नगरसेवक सिद्धार्थ फंड, रुपेश हरकल आदींसह महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी या यात्रेचे उत्साहात स्वागत केले, महिलांची आणि युवकांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. दरम्यान, या जलयात्रेचा पुढील मुक्काम शिर्डी येथे असणार असून, त्र्यंबकेश्वर येथून आलेल्या दुसऱ्या यात्रेसोबत एकत्रितपणे ही यात्रा पुढे घृष्णेश्वरकडे प्रस्थान करणार आहे. या यात्रेचा समारोप महेश्वर येथे होणार असून, त्याठिकाणी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

यावेळी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित ‘गोदा ते नर्मदा’ जलयात्रा ही जनजागृती आणि प्रेरणेचा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या यात्रेत अहिल्याबाई होळकर यांनी जलसंधारण आणि पाणी व्यवस्थापन क्षेत्रात केलेल्या कार्याचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्यावर भर देण्यात आला आहे.

एकूणच, ‘गोदा ते नर्मदा’ जलयात्रेच्या निमित्ताने श्रीरामपूर शहरात जलसंवर्धनाबाबत जागरूकता निर्माण झाली असून, नागरिकांमध्ये पाणी वाचवण्याची भावना दृढ होताना दिसून आली. ही यात्रा पुढील प्रवासातही अशाच प्रकारे जनजागृती करत राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## खरीप हंगामासाठी शास्त्रशुद्ध नियोजनाचा संदेश; आढळगावात शेतकरी सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**श्रीगोंदा । वीरभूमी–**
आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शास्त्रशुद्ध शेती पद्धतींचा अवलंब करण्याचे महत्त्व अधोरेखित करणारी शेतकरी सभा रविवारी दि. २६ रोजी आढळगावचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज मंदिर येथे उत्साहात पार पडली.

सकाळी आठ वाजता सुरू झालेल्या या सभेला परिसरातील शेतकरी बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सभेत उपस्थित शेतकऱ्यांना आधुनिक व वैज्ञानिक शेती पद्धतींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. माती नमुना घेण्याची योग्य पद्धत, माती परीक्षणाचे महत्त्व आणि त्यानुसार खत व्यवस्थापन या विषयांवर विशेष भर देण्यात आला. यासोबतच एल निनो या हवामान घटकाचा खरीप हंगामावर होणारा संभाव्य परिणाम आणि त्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती देण्यात आली.

खरीप पिकांचे शास्त्रीय नियोजन, उत्पादनवाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शनामुळे कमी खर्चात अधिक उत्पादन घेण्याचा आत्मविश्वास शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

सभेच्या शेवटी उपस्थित शेतकऱ्यांनी माती परीक्षणावर आधारित शेती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादन वाढविण्याचा निर्धार व्यक्त करण्याची दक्षता घेण्याचे सहाय्यक कृषि अधिकारी पि. जी. देवकाते यांनी आवाहन केले. या सभेचे आयोजन गावचे नेते व प्रगतशील शेतकरी उत्तमराव राऊत व सहकाऱ्यांनी केले होते.

## संजीवनी आयुर्वेद कॉलेजची प्रीती शेजवळ राज्यस्तरीय संगीत महोत्सवात प्रथम

**कोपरगाव । वीरभूमी–**
संजीवनी आयुर्वेद कॉलेज अँड रिसर्च सेंटरच्या प्रीती अनिल शेजवळ हिने सोलो वेस्टर्न व्होकल या गायन प्रकारात महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस आयोजित ‘युथ फेस्ट २०२६’ अंतर्गत ‘स्पंदन २०२६’ या राज्यस्तरीय संगीत महोत्सवात प्रथम क्रमांक मिळवून संजीवनी आयुर्वेद कॉलेजच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. तर याच स्पर्धेत श्रुती नामदेव पठारे हिने सोलो लाईट इंडियन व्होकल या गायन प्रकारात तृतीय क्रमांक मिळवून आपली छाप पाडत संजीवनी सर्वच क्षेत्रात अग्रेसर असल्याचे सिद्ध केले.



स्पंदन २०२६ या राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यभरातून ३० पेक्षा अधिक आयुर्वेद महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धा सिन्नर येथे संपन्न झाल्या. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वांगीण विकासासाठी संजीवनी आयुर्वेद महाविद्यालयात सातत्याने विविध उपक्रम राबवले जातात. अभ्यासक्रमासोबतच कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाते.

याच प्रयत्नांचा परिणाम म्हणून महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी विविध स्तरांवरील स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत असून संस्थेचे नाव उंचावत आहेत. वैद्यकीय शिक्षणातून सक्षम डॉक्टर घडविण्याबरोबरच विद्यार्थी उत्तम नागरिक बनावेत यासाठी संजीवनी नेहमी कटिबद्ध असते.

संजीवनीचे अध्यक्ष नितीन कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे, विश्वस्त सुमित कोल्हे यांनी स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थीनींचे अभिनंदन केले. तसेच प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार, नॉन-अकॅडमिक संचालक श्री. डी. एन. सांगळे, संगीत शिक्षक शुभम जाधव व महेश गुरव आणि समन्वयक डॉ. साईबन मसने व डॉ. यितल अष्टेकर यांचेही अभिनंदन करण्यात आले.

# निसर्गप्रेमी रमाकांत डेरे यांच्या प्रकल्पांना परदेशी अभ्यासकांची भेट

### ग्रामीण संस्कृती, शेती व पर्यावरणपूरक प्रयोगांचा घेतला अभ्यास; राजूर येथील संग्रहालयांनी वेधले लक्ष

**अकोले । वीरभूमी –**
नेदरलँड येथून आलेल्या हॅना ब्रदर (वैगनिंगन) आणि हैदराबाद येथील तारकराम यांनी नुकतीच ज्येष्ठ पर्यावरण तज्ञ रमाकांत डेरे यांच्या राजूर येथील गारगोटी संग्रहालयासह जुन्या काळातील नाणी, पोस्टाची तिकिटे आणि निसर्गातील विविध आकारांच्या लाकडांच्या प्रदर्शन दालनाला भेट दिली.

दगडांचा देव म्हणून प्रसिद्ध असलेले तसेच चंदन लागवडीला राजाश्रय मिळवून देणारे ज्येष्ठ शेतीतज्ज्ञ रमाकांत डेरे गेली पाच ते सहा दशके विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. शेतकरी व आदिवासी बांधवांचे प्रश्न सोडवण्यासाठी ते सदैव तत्पर असून त्यांच्या कार्याची दखल घेण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर त्यांच्या भेटीला येत असतात.

सावरकुटे या आदिवासीबहुल गावातील फळबाग लागवडीचा त्यांचा प्रयोग देशभर गाजलेला आहे. नैसर्गिक स्रोतांचा योग्य वापर करून जीवनमान उंचावण्यासाठी फळबाग लागवडीतून स्थायी रोजगार निर्माण करण्याचे त्यांनी उभे केलेले मॉडेल प्रेरणादायी ठरले आहे. चंदन शेतीच्या माध्यमातून हजारो शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत त्यांनी पर्यावरणपूरक शेतीचा मार्ग दाखवला आहे.

चंदनाला शेती प्रकारात समाविष्ट करण्यासाठी शासन दरबारी त्यांनी केलेला सत्याग्रह सर्वश्रुत आहे. खाजगी मालकीच्या जमिनीत चंदन लागवड करून त्याची नोंद सातबारावर घेता येते, हे त्यांच्या प्रयत्नांतून शक्य झाले.

रमाकांत डेरे यांचा मित्रपरिवार जगभर पसरलेला आहे. या मित्रांच्या माध्यमातून त्यांनी विविध देशांतील पोस्टाची तिकिटे, चलनात असलेली व नसलेली विविध आकारांची नाणी, निसर्गात सापडलेले दगड व गारगोटी, जंगलातील विविध प्रकारचे लाकूड, सागापासून बनवलेले भव्य फर्निचर तसेच जुन्या काळातील पुस्तके व नियतकालिके यांचा मोठा संग्रह राजूर येथील दालनात उभा केला आहे.

त्यांच्या बहुआयामी कार्याची दखल घेत नेदरलँडमधील हॅना ब्रदर यांनी राजूर येथे प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे विविध प्रयोग समजावून घेतले. त्यांनी सुमारे तीन तास वेळ देत डेरे यांच्या कार्याचा सखोल अभ्यास केला. ग्रामीण व भारतीय संस्कृती, शेती व शेतीपूरक व्यवसाय, तसेच



आदिवासी जीवनपद्धती यांचा त्यांनी जवळून अभ्यास केला.

या भेटीदरम्यान भारतातील अनेक आठवणी सोबत घेऊन जात असल्याचे गौरवोद्गार हॅना ब्रदर यांनी व्यक्त केले.

# महसूल विभागाचे जुने कायदे बदलून प्रशासन लोकाभिमुख करणार

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे । महसूलमंत्र्यांनी शिर्डीत घेतला जनता दरबार

**● कोपरगाव । वीरभूमी –** राज्याचे महसूल खाते हे नागरिकांच्या मालमत्तेचे रक्षण करते. त्यामुळे जुन्या महसूल कायद्यांमधील क्लिष्ट प्रक्रिया कमी करून सर्वसामान्यांना जलद न्याय देण्यासाठी कायदे बदलण्यात येत आहेत, असे प्रतिपादन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांची थेट सोडवणूक करण्यासाठी शिर्डी अपर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जनता दरबारात ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, शैलेश हिंगे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, शिर्डी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, माजी आमदार स्नेहलता कोल्हे आदी उपस्थित होते.

महसूलमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, शेतीच्या रस्त्यांचे वाद मिटवण्यासाठी पुढील पाच वर्षांत सर्व पाणंद रस्ते बारमाही केले जातील व त्यांच्या कडेला वृक्षलागवड केली जाईल. सातबारा उताऱ्यावरील मृत व्यक्तींचे नाव कमी करण्यासाठी नागरिकांना हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी तहसीलदारांनी स्वतः हून ही दुरुस्ती करावी. जमिनीच्या मोजणीसाठी लागणारा वेळ कमी करण्यासाठी खासगी मोजणीदार नेमून ड्रोनच्या साहाय्याने केवळ पंधरा दिवसांत मोजणी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

गोरगरिबांना हक्काचे घर मिळावे यासाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार २०११ पूर्वी गायरान व सरकारी जागेवर बांधलेली निवासी घरे नियमित केली जाणार आहेत. या निर्णयामुळे भटके विमुक्त, पारधी समाजासह अनेक गरिबांना मोठा आधार मिळेल. केवळ एक हजार रुपये शुल्क आकारून ग्रामपंचायतीच्या दप्तरात या घरांची नोंदणी करून मालकी हक्क दिला जाईल, असेही श्री. बावनकुळे यांनी सांगितले.

महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणांबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. अधिकाऱ्यांनी त्यांच्याच स्तरावर नागरिकांचे प्रश्न सोडवले तर लोकांना मंत्रालयात येण्याची वेळ येणार नाही. महसुली प्रकरणांच्या सुनावणीत तारखांवर तारखा न देता केवळ दोन तारखांमध्ये निर्णय घेण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. दुसऱ्या तारखेला लेखी युक्तिवाद न आल्यास एकतर्फी आदेश काढले जातील, असे त्यांनी सांगितले.

नागरिकांची कामे वेळेत व्हावीत यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. अधिकाऱ्यांकडे जाऊनही काम पूर्ण न झाल्यास नागरिकांनी माझ्या व्हॉट्सप क्रमांकावर स्वतःचे नाव व कामाचा तपशील पाठवावा, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, नागरिकांचे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. अकृषिक परवानगी, वाळू धोरण, शेतरस्ते व तुकडेबंदी कायद्याबाबत शासनाने घेतलेल्या लोकोपयोगी निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी जिल्ह्यात केली जात आहे. राज्याच्या व देशाच्या आर्थिक प्रगतीत महसूल तसेच भूमी अभिलेख विभागाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.




वर्ष २०४७ पर्यंत देशाला 'विकसित राष्ट्र' बनवण्याच्या ध्येयपूर्तीसाठी शासकीय यंत्रणा काम करत आहे. या संकल्पासाठी गाव पातळीवरील कोतवाल, तलाठी ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वजण प्रयत्नशील आहेत. नागरिकांच्या अडीअडचणी शक्यतो जिल्हा पातळीवरच सोडवल्या जातील व आवश्यकतेनुसार कायद्यात किंवा शासन निर्णयात बदल करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात श्री. कोळेकर यांनी महसूल विभागाची अकृषिक परवानगी कायद्यातून रद्द करणे, घरांसाठीची तुकडे खरेदी विना-नजराणा नियमानुकूल करणे, ५०० रुपयांच्या स्टॅम्पवर कौटुंबिक वाटपपत्राची नोंदणी करणे, सातबारा उताऱ्यावरील कालबाह्य नोंदी वगळणे व 'बळीराजा शेत पाणंद योजने'तून कृषी विकासाला चालना देणारे धोरण या ऐतिहासिक निर्णयांबद्दल माहिती दिली.

यावेळी महसूलमंत्र्यांनी दोनशेहून अधिक नागरिकांची निवेदने प्रत्यक्ष स्वीकारली. यातील काही निवेदनांवर जागेवरच निर्णय दिला, तर काही निवेदनांचा पंधरा दिवसांच्या आत निपटारा करण्याची ग्वाही दिली. याप्रसंगी महसूलमंत्र्यांच्या हस्ते महसुली सेवांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

# स्वराज्य जनजागृती परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी टिळक भोस

**● श्रीगोंदा । वीरभूमी –** लोकशिक्षण व लोकजागृतीचा ध्यास घेऊन कार्यरत असलेल्या स्वराज्य जनजागृती परिषदेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी टिळक गोपीनाथ भोस यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.



टिळक भोस यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रमांद्वारे सातत्याने कार्य केले असून, समाजात त्यांची सकारात्मक प्रतिमा निर्माण झाली आहे. नव्या जबाबदारीमुळे त्यांना जनतेशी अधिक व्यापक पातळीवर संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. स्वराज्य जनजागृती परिषद ही संघटना जनहित साध्य करण्यासाठी, तसेच लोकशिक्षण व लोकजागृतीसाठी विविध उपक्रम राबविणार आहे. नागरिकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, जनहिताच्या कायद्यांविषयी मार्गदर्शन शिबिरे आयोजित करणे, विद्यार्थी व शेतकऱ्यांसाठी अभ्यासवर्ग घेणे, शासकीय योजना तळागाळापर्यंत पोहोचविणे आणि नागरिकांना निर्भय व सक्षम बनविणे, यावर संघटनेचा भर राहणार आहे.

व्यक्तीला नव्हे, तर भ्रष्ट व्यवस्थेला विरोध या तत्वावर कार्य करत जिल्ह्यात अधिकाधिक कार्यकर्ते घडविण्याचा संकल्प भोस यांनी व्यक्त केला. संघटनेत जास्तीत जास्त युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले. टिळक भोस यांच्या नियुक्तीचे स्वागत परिषदेचे उपाध्यक्ष संदीप जगताप, सचिव तुषार पाटील, सहसचिव अरुण बोबडे, कोषाध्यक्ष शिवाजी खेडकर, विश्वस्त विष्णू ढवळे व गोवर्धन मस्के यांच्यासह नागरिकांनी केले आहे.

> राजकीय नेत्यांकडून कार्यकर्त्यांचा केवळ स्वार्थासाठी वापर होत असल्याची खंत व्यक्त करत, कार्यकर्त्यांच्या अडचणीच्या काळात त्यांना मदत मिळत नाही. सद्यस्थितीला भ्रष्टाचार वाढला असून प्रशासनाकडूनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. जनता, शेतकरी, विद्यार्थी यांचे हजारो प्रश्न प्रलंबित आहेत या पार्श्वभूमीवर स्वराज्य जनजागृती परिषद सामान्य जनतेचा आवाज बुलंद करत भ्रष्टाचाराविरोधात लढा उभारणार असून, जिल्हाभर जाब विचारणारे कार्यकर्ते घडविण्याचा निर्धार करणार आहे.
>
> **– टिळक भोस**

# कडक उन्हात शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यार्थ्यांसह पालकांचीही कसोटी

## प्रशासनाच्या सूचनांकडे दुर्लक्ष । वेळापत्रक न बदलल्याने वाढला त्रास

**● पाथर्डी । वीरभूमी –** सुमारे ४१ अंश सेल्सिअस एवढे तापमान, तांत्रिक कामासाठी बंद करण्यात आलेला वीजपुरवठा, प्रचंड उकाड्याने हैराण झालेले पर्यवेक्षक, विद्यार्थी व परीक्षेशी संबंधित यंत्रणा, तसेच केंद्राबाहेर रखरखत्या उन्हाच्या झळा सोसत झाडाच्या सावलीत बसलेले पालक-अशा वातावरणात राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने प्राथमिक शिक्षण विभागामार्फत चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. उन्हाच्या तीव्रतेमुळे परीक्षेसह सर्व शालेय कामकाज सकाळी ११ वाजेपर्यंत पूर्ण करावे, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी यापूर्वीच दिले होते. मात्र त्या आदेशाकडे संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष झाल्याचे दिसले.

राज्य परीक्षा परिषदेच्या पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार जिल्ह्यात चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. जिल्ह्यातून सुमारे सव्वा लाख विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. शिक्षण विभागाच्या सहसचिवांनी परीक्षांसंबंधी आपत्ती व्यवस्थापन कालावधीतील सर्व अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केले होते. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व गटशिक्षणाधिकारी व महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळांना आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत पत्र देत उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या. हवामान विभागाने जिल्ह्यातील वाढत्या तापमानाबाबत इशारा दिला होता. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून १८ एप्रिलपासून शाळांचे वेळापत्रक सकाळी ७ ते ११ असे ठेवण्याचे आदेश देण्यात आले होते. शिक्षकांनी सकाळी ७ ते १२ या वेळेत उपस्थित राहून परीक्षेचे कामकाज पूर्ण करावे, असेही सांगण्यात आले होते.

प्रत्यक्षात मात्र शिष्यवृत्ती परीक्षेचा पेपर सकाळी ११ वाजता सुरू होत असल्याने विद्यार्थ्यांना सकाळी १० वाजताच केंद्रावर बोलावण्यात आले. तालुक्यात चौथीसाठी १७ आणि सातवीसाठी १४ परीक्षा केंद्रे होती. बहुतांश केंद्रे बंदिस्त शाळांमध्ये होती. पिण्याच्या पाण्याची काही प्रमाणात व्यवस्था करण्यात आली होती.

शिक्षण विभागाने काही प्रमाणात खबरदारी घेतली असली तरी शहरात दुपारी २ वाजेपर्यंत वीजपुरवठा खंडित होता. उन्हाची तीव्रता इतकी होती की, बाहेर पाहताना डोळे दिपून जात होते. लग्नाचा मुहूर्त असूनही रस्त्यांवर शुकशुकाट होता. या पार्श्वभूमीवर राज्य परीक्षा मंडळाचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत काळजी घेण्याचे आवाहन केले. त्यांनी संदेशात म्हटले आहे की, वाढत्या उन्हाचा विचार करून पुरेसे पाणी प्या, पाण्याची बाटली सोबत ठेवा, डोके झाकून ठेवा, टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करा, हलके व सुती कपडे परिधान करा आणि सकस आहार घेऊनच परीक्षेला जा. स्थानिक यंत्रणांनीही तातडीच्या प्रसंगी वैद्यकीय मदत मिळावी यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या होत्या. सकाळी साडेसात ते नऊ आणि दहा ते साडेअकरा अशा वेळेत परीक्षा घेणे स्थानिक पातळीवर शक्य होते, मात्र याबाबत संबंधित यंत्रणांनी आवश्यक जागरूकता दाखवली नाही.

या कडक उन्हात विद्यार्थ्यांबरोबरच पालकांनाही त्रास सहन करावा लागल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली. दहावी-बारावीच्या परीक्षांपेक्षा शिष्यवृत्ती परीक्षा चांगल्या वातावरणात पार पडल्याचे एकमेव समाधानकारक चित्र दिसले. लहान मुलांना उन्हाच्या झळा बसण्याचा धोका अधिक असतो. शरीरातील पाण्याची कमतरता झाल्यास भोवळ येणे, मळमळ, थकवा असे त्रास संभवतात. त्यामुळे जिल्हानिहाय हवामानाचा अभ्यास करून परीक्षांचे नियोजन करणे गरजेचे आहे.

कुठलीही परीक्षा विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा कस पाहणारी असते; ती त्यांच्या शारीरिक क्षमतेची किंवा प्रतिकूल वातावरणाची परीक्षा ठरू नये. शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता, गोडी आणि सकारात्मकता निर्माण व्हायला हवी. मात्र वाढता ताण, खर्च आणि व्यवस्थेतील उदासीनता पाहता शिक्षण प्रणालीबाबत पुनर्विचार करण्याची गरज या निमित्ताने प्रकर्षाने जाणवते.

# स्व. अशोकराव भांगरे यांना 'जाणीव' संस्थेचा राज्यस्तरीय जाणीव पुरस्कार

## आदिवासी समाजासाठीच्या कार्याची मरणोत्तर दखल । सुनीताताई भांगरे यांनी स्वीकारला सन्मान

**● अकोले । वीरभूमी–** आदिवासी समाजाचा बुलंद आवाज, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तसेच जिल्हा सहकारी बँकेचे माजी संचालक स्व. लोकनेते अशोकराव भांगरे यांना 'जाणीव सांस्कृतिक अभियान कार्यक्षेत्र' आयोजित २०२४-२५ चा राज्यस्तरीय 'जाणीव पुरस्कार' मरणोत्तर प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार त्यांच्या सुविद्य पत्नी सुनीताताई भांगरे यांनी स्वीकारला.

अहिल्यानगर येथे झालेल्या या सोहळ्यात स्व. अशोकराव भांगरे यांचा सन्मान स्वीकारताना सुनीताताई भांगरे भावुक झाल्या. भांगरे साहेबांनी समाजासाठी केलेल्या कार्याची दखल घेतल्याबद्दल त्यांनी 'जाणीव' संस्थेचे आभार मानले.

आदिवासी समाजातील लोकांना मदत करणे, तसेच आदिवासी मुलांना शिक्षणाच्या माध्यमातून प्रगतीची संधी उपलब्ध करून देणे, या कार्यात स्व. भांगरे यांचे मोठे योगदान होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक आदिवासी विद्यार्थी उच्च व अतिउच्च शिक्षण घेऊन देश-विदेशात पोहोचलेले असून ते विविध पदावर काम करत आहेत.

त्यांच्या अथक परिश्रमांमुळे आदिवासी समाजाला व्यापक ओळख मिळाली. त्यांच्या कार्याचा गौरव हा तालुक्यासह जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

हा सन्मान केवळ आमच्या साहेबांचा नसून संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा, आदिवासी समाज आणि महाराष्ट्रासाठी गौरवाचा क्षण आहे, असे मत सुनीताताई भांगरे यांनी व्यक्त केले.

यावेळी सुभाषजी वारे, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, श्री. एन. बी. धुमाळ, मेघाताई काळे, भाग्यश्रीताई आवारी, नाजमीनताई शेख यांच्यासह अहिल्यानगर जिल्हा तसेच राज्यभरातील मान्यवर, नागरिक आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

